


Postal Registration No-SRP/127/2024-26 | RNI No. MAH/MAR/2015/74917 | dainikpravarateer01@gmail.com | 9970 96 6399

प्रवरा पब्लिकेशन

सायं. दैनिक

# प्रवरातीर

विकासाचा पुरस्कार - अन्यायाचा तिरस्कार

मुख्य संपादक : शिवपालसिंह प्र. ठाकुर | 9372013375 | संपादक : धिरजसिंह शिवपालसिंह प्र. ठाकुर | 9970968399

पॅनल देणे आहे

वर्ष ११ वे | अंक २८७ वा | पाने ४ | किंमत २ रु.

संगमनेर - अकोले - कोपरगाव - रहाता - राहुरी

वार गुरुवार दिनांक २४ सप्टेंबर २०२६










# तालुक्याला हक्काचे पाणी व पूर्ण दाबाने वीज, मिळालीच पाहिजे - माजी मंत्री थोरात

**प्रवरातीर | वृतसेवा**

**संगमनेर प्रतिनिधी**


तालुक्यात दुष्काळ सदृश्य परिस्थिती निर्माण झाली असून शेतकरी हवालदिल झाला आहे. पिके वाया गेली, तालुक्यात विजेचा मोठा खेळखंडोबा झाला असून तालुक्याचे हक्काचे पाणी पळवले जात आहे. या विरोधात तालुक्यातील हजारो शेतकरी, नागरिक, युवक व महिला यांनी रस्त्यावर उतरून सरकार व प्रशासना विरोधात महाअक्रोश मोर्चा काढला असून सरकारने महाराष्ट्रात त्वरित दुष्काळ जाहीर करून शेतकरी व शेतमजुरांना मोठी मदत करावी अशी आग्रही मागणी काँग्रेस पक्षाचे नेते मा महसूल व कृषी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी केली आहे. याचबरोबर सरकार जागे झाले नाही तर जागा सोडावी लागेल असा इशाराही त्यांनी सरकारला दिला आहे.

## सरकार व प्रशासनाच्या विरोधात संगमनेर मध्ये हजारो नागरिकांचा महाअक्रोश मोर्चा..



प्रशासनाच्या नाकर्तेपणामुळे संतप्त शेतकरी प्रांताधिकारी कार्यालयात घुसले

संगमनेर मध्ये शेतकरी व नागरिक यांच्या वतीने दुष्काळ जाहीर करावा, तातडीने मदत मि ळा वी (पान ०२ वर...)




# संगमनेरात 2 लाख 60 हजाराचे काऊ घी जप्त

**प्रवरातीर | वृतसेवा**

**संगमनेर प्रतिनिधी**

सणासुदीच्या पार्श्वभूमीवर अन्न भेसळीला आळा घालण्यासाठी अन्न व औषध प्रशासन विभागाने जिल्ह्यात व्यापक मोहीम सुरू केली आहे. या मोहिमेंतर्गत संगमनेर तालुक्यातील एका खाद्य आस्थापनेवर अचानक तपासणी करून २ लाख ६० हजार ८२० रुपये किंमतीचा संशयास्पद 'काऊ घी'चा साठा जप्त करण्यात आला. त्याचबरोबर बीड जिल्ह्यातील दूध भेसळ प्रकरणाशी संबंधित कारवाईत जामखेड तालुक्यातील एका (पान ०२ वर...)




# त्या कटकारस्थानी पोलीस अधिकाऱ्याची अखेर उचल बांगडी

**प्रवरातीर | वृतसेवा**

**संगमनेर प्रतिनिधी**

संगमनेर शहरातील एमडी ड्रग्ज प्रकरणावरून निर्माण झालेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर पोलीस प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. दरम्यान, काही माध्यमांनी सुरुवातीपासून या प्रकरणातील वास्तव परिस्थिती मांडल्यानंतर वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी कठोर भूमिका घेतली असून, अखेर दि. २२ सप्टेंबर रोजी सायंकाळी श्रीरामपूरच्या अपर अधीक्षकांच्या गोपनीय अहवालावरून वादग्रस्त पोलीस उपनिरीक्षक श्रीकांत सावंत यांची संगमनेर शहर पोलीस ठाण्यातून उचलबांगडी करण्यात आली असून त्यांना नियंत्रण कक्षात जमा करण्यात आले आहे. या कारवाईमुळे प्रकरणाला आता नवे वळण मिळाले आहे.




(पान ०२ वर...)

## तालुक्याला हक्काचे पाणी व पूर्ण दाबाने वीज, मिळालीच पाहिजे - माजी मंत्री थोरात

तालुक्याला हक्काचे पाणी मिळावे, पूर्ण दाबाने वीज पुरवठा व्हावा, आवर्तन काळात नदीकाठी हक्काची 11 तास वीज उपलब्ध असावी यासाठी शेतकऱ्यांचा भव्य आक्रोश मोर्चा संपन्न झाला. यशोधन कार्यालय ते प्रांताधिकारी कार्यालय झालेल्या या मोर्चामध्ये काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात, माजी आमदार डॉ सुधीर तांबे, सौ दुर्गाताई तांबे, डॉ जयश्रीताई थोरात ,ॲड माधवराव कानवडे, तालुकाध्यक्ष अजय फटांगरे यांच्यासह काँग्रेस पक्षाचे सर्व पदाधिकारी तसेच शेतकरी बैलगाडी ट्रॅक्टर जळालेली पिके घेऊन मोर्चात सहभागी झाले होते. या प्रसंगी सरकारच्या व प्रशासनाच्या विरोधी घोषणाबाजी करण्यात आली.

यावेळी संगमनेर ब स स्था न का स मो र शेतकऱ्यांच्या आक्रोश मोर्चात बोलताना काँग्रेस पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात म्हणाले की, संपूर्ण राज्यामध्ये प्रचंड दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाली असून पिके जळाली आहेत. शेतकरी आत्महत्या करत आहेत. मात्र तरीही सरकार जागे व्हायला तयार नाही. सरकार जागे झाले नाही तर शेतकरी त्यांना जागा सोडायला लावेल.

खोट्या बातम्या द्यायच्या, आशेला लावायचे हे काम सरकार करत आहे. दुसऱ्या विषयाकडे जनतेचे लक्ष वळून दिशाभूल करायची. असा उद्योग सुरू असून खोट्या बातम्या नको तर प्रत्यक्ष मदत हवी आहे. सर्वत्र पिके वाया गेली आहे. पंचनामे कसले करता, राज्यात कुठे पाऊस नाही त्यामुळे सर्वांना मदत करा.

यावर्षी 1972 पेक्षा वाईट परिस्थिती निर्माण झाली आहे पावसावर आधारित संपूर्ण शेती उध्वस्त झाली आहे. मात्र सरकार बातम्यांच्या बाहेर पडायला तयार नाही. बातम्या नको ठोस मदत करा.

नवीन माणसांना पाण्याची लढाई माहित नाही. हक्काच्या 30% पाण्यासाठी सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली स्वर्गीय पिचड साहेब आणि आम्ही लढलो आणि म्हणून पाणी मिळाले. त्यावेळी पूर्वीचे पाट रुंद केल्यामुळे पुन्हा पाणीपूर्वेकडे वाहून जात होते .पुन्हा न्यायालयीन लढाई करून आवर्तन काळामध्ये 11 तास हक्काची वीज मंजूर करून घेतली.

निळवंडे धरण व पाठासाठी रक्ताचे पाणी करून ते पूर्ण केले. प्रत्येकाचे पुनर्वसन केले. निधी आणला. तालुक्यातील साडे बासष्ट हजार एकर शेती या पाण्याखाली येणार आहे. हे या शेतकऱ्यांच्या हक्काचे पाणी आहे. दोन्ही कालव्यांना काँक्रिटीकरण केल्याने पाणी पुढे जात आहे. हक्काचे पाणी उचलता येत नाही आणि उचलले तर तीन लाखापर्यंत ग्रामपंचायतना बिल आले आहे. विज जाते म्हणजे फक्त वीज जात नाही. तर पाणी पुढे जाते .पाणी पुढे गेले तर संपूर्ण जीवन आणि अर्थव्यवस्था उद्ध्वस्त होईल म्हणून वेळीच जागे व्हा. असे सांगताना सरकारने शेतकऱ्याच्या शेतावर काम करणाऱ्या शेतमजुराचा सुद्धा विचार केला पाहिजे .त्याची सुद्धा मजुरी दिली पाहिजे. याचबरोबर आता कोणतीही दिरंगाई न करता दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना मोठी मदत करा. तालुक्याला हक्काचे पाणी व वीज मिळाली पाहिजे अशी मागणी मागणी त्यांनी केली.

तर मा आ डॉ. सुधीर तांबे म्हणाले की, तालुक्यामध्ये विजेचा खेळ खंडोबा झाला आहे .तोंडाचा घास पळवला जात आहे अत्यंत बिकट परिस्थिती निर्माण झाली आहे बाजारपेठ ओस पडत चालली आहे .शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढले आहे. सत्ताधारी संगमनेर तालुक्याकडे द्दष्ट बुद्धीने पाहत आहेत. जगात प्रकाश पाडला म्हणतात पण इथे अंधार पडला आहे त्याचे काय असा सवाल त्यांनी केंद्र व राज्य सरकारला केला.

तर डॉ जयश्रीताई थोरात म्हणाल्या की, मोठा संघर्ष करून संगमनेर तालुक्याला हक्काचे पाणी व वीज लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी मिळवली आहे. निळवंडे धरण व दोन्ही कालवे त्यांनी पूर्ण केले डोळ्यात देखत पाणी वाहून चालले आहे. धरण थोरात साहेबांनी केले आणि तुम्ही खोटे श्रेय कशाला घेता. 85 पूर्वी तालुक्यामध्ये 3 सब स्टेशन होते आता 28 विजेचे सबस्टेशन कार्यरत आहे. विजेचे जाळे निर्माण केले आहे. तालुका विकसित आणि समृद्ध केला आहे. मात्र काही लोक फ्लेक्सच्या पुढे जायलाच तयार नाही. तर नवीन लोकप्रतिनिधीचे नाव न घेता भाऊ तुम्ही चांगला अभ्यास करा. तालुका उभा कोणी केला आहे. हे चांगले पहा. असा टोला त्यांनी लगावला.

मोर्चामध्ये संगमनेर चे नवीन लोकप्रतिनिधी यांच्यावर शेतकऱ्यांनी जोरदार टीका केल्या. यानंतर माजी मंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले की फ्लेक्सच्या पुढे त्यांचे राजकारण नाही. कधी एक वाक्य पाण्यावर हा गडी बोलत नाही .गावोगावी 2000 फ्लेक्स लावले आहेत. फ्लेक्सला पैसे आले कुठून माहित नाही. फ्लेक्स लावून पोट भरणार नाही. फ्लेक्स चे पैसे गरिबांसाठी खर्च करा. या फ्लेक्सबाज वृत्तीचा तालुका निषेध करत असून तालुक्यातील नागरिकांना काम पाहिजे. त्यामुळे अशा निष्क्रिय माणसाची जास्त चर्चा करू नये असा टोला मा. मंत्री बाळासाहेब थोरात यांनी नाव न घेता लगावला. यावेळी उपस्थित नागरिकांनी जोरदार घोषणाबाजी केली

## संगमनेरात 2 लाख 60 हजाराचे काऊ घी जप्त

दूध संकलन केंद्राचा परवाना निलंबित करण्यात आला आहे.

गुप्त माहितीच्या आधारे सहायक आयुक्त (अन्न) सो. ह. इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली अन्न सुरक्षा अधिकारी उ. र. सूर्यवंशी यांच्या पथकाने सोमवारी, दि. २१ सप्टेंबर रोजी संगमनेर येथील 'मे. व्ही. एस. एकदंत फुड प्रॉडक्ट्स' या आस्थापनेची अचानक तपासणी केली. तपासणीदरम्यान अन्नपदार्थांच्या दर्जाबाबत संशय निर्माण झाल्याने अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ अंतर्गत कारवाई करण्यात आली.

या कारवाईत 'काऊ घी (जार)' आणि 'काऊ घी (१५ किलो टिन)' या साठ्यातून कायदेशीर नमुने घेण्यात आले. यामध्ये १ लाख ३५ हजार ५२० रुपये किंमतीचे १७६ लिटर काऊ घी जार, म्हणजेच १ लिटरचे १७६ जार, तसेच १ लाख २५ हजार ३०० रुपये किंमतीचे १७९ किलो काऊ घी टिन, म्हणजेच १५ किलोचे १२ टिन, असा एकूण २ लाख ६० हजार ८२० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

जप्त करण्यात आलेले अन्न नमुने पुढील रासायनिक विश्लेषणासाठी प्रयोगशाळेत पाठविण्यात आले आहेत. प्रयोगशाळेचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर संबंधित दोषींवर कायद्यातील तरतुदींनुसार पुढील कारवाई केली जाणार असून, या प्रकरणाचा तपास अन्न सुरक्षा अधिकारी उ. र. सूर्यवंशी करीत आहेत.

दरम्यान, आष्टी (जिल्हा बीड) येथे उघडकीस आलेल्या दूध भेसळ प्रकरणात सहभाग निष्पन्न झाल्याने अहिल्यानगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातील 'मे. भगवान कृपा दूध संकलन व शीतकरण केंद्र, खर्डा' या आस्थापनेचा परवाना निलंबित करण्यात आला आहे. या केंद्राचे मालक हरिदास एकनाथ गोपाळघरे आहेत.

## त्या कटकारस्थानी पोलीस अधिकाऱ्याची अखेर उचल बांगडी

संगमनेर शहरात जुन्या वादातून एका निष्पाप तरुणाला ड्रग्ज प्रकरणात अडकविण्यासाठी कट रचल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणात काशिफ कुरेशी यांच्या दुचाकीच्या डिकीत ३९ ग्रॅम एमडी ड्रग्ज ठेवण्यात आल्याचा आरोप असून, त्यानंतर पोलिसांना माहिती देऊन कारवाई करण्यात आल्याचे समोर आले आहे.

या कारवाईत पोलीस उपनिरीक्षक श्रीकांत सावंत यांनी आपल्या सहकाऱ्यांसह कारवाई केल्याचे वृत्त समोर आले होते. मात्र, घटनास्थळाचे सीसीटीव्ही फुटेज समोर आल्यानंतर या प्रकरणातील घटनाक्रमाबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले. या पार्श्वभूमीवर पोलीस प्रशासनाच्या भूमिकेची सखोल चौकशी करण्याची मागणी पुढे आली.

या प्रकरणाचा तपास सुरुवातीला श्रीरामपूर विभागाचे अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांच्या देखरेखीखाली होता. त्यानंतर प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन तपास अहिल्यानगरच्या एलसीबीकडे सोपविण्यात आला. तपासादरम्यान ड्रग्जचा साठा कुठून आला, तो संबंधित तरुणाच्या दुचाकीपर्यंत कसा पोहोचला आणि या संपूर्ण प्रकरणामागे आणखी कोणाचा सहभाग आहे, याचा तपास महत्त्वाचा ठरणार आहे.

या प्रकरणात तौसीब कुरेशी आणि त्याचे साथीदार यांच्याबाबतही प्रश्न उपस्थित झाले आहेत. दुचाकीच्या डिक्कीत ड्रग्ज ठेवणाऱ्या व्यक्तींची भूमिका तसेच या प्रकरणातील मुख्य सूत्रधार कोण आहेत, याचा शोध तपास यंत्रणेला घ्यावा लागणार आहे.








विकणे आहे
2009 मॉडेल मॅक्सी ट्रक(पिक अप) विकणे आहे
इन्सुरन्स पुर्ण आहे,पासींग झालेली आहे.
त्वरित विकणे आहे.
डिलर नको,स्वत:व्यक्ती पाहिजे.
कॉन्टक्क नंबर-
9822339922









# संगमनेर नगरपालिकेकडून कामगार संघटनेच्या मागण्यांना सकारात्मक प्रतिसाद

**प्रवरातीर | वृत्तसेवा**
**संगमनेर प्रतिनिधी**

संगमनेर नगरपालिके मध्ये असलेल्या कामगारांची संघटना अहमदनगर जिल्हा नगरपालिका कामगार संघटना शाखा संगमनेर यांनी त्यांच्या मागण्यांचे निवेदन नगरपालिकेतील दिले होते त्या निवेदनानुसार आज नगरपालिका व कामगार संघटना यांच्यामध्ये बैठक झाली निवेदनामध्ये एकूण 19 मागण्या करण्यात आले होत्या त्यातील ज्या मागण्या तात्काळ शक्य आहेत त्या मंजूर करण्यात आल्या व ज्या शासन स्तरावर आहे त्याचा तातडीने पाठपुरवठा करण्यात येईल तसेच दर तीन महिन्याला संघटना व नगरपालिका यांच्यामध्ये बैठका होतील व प्रश्न कसे मार्गी लागतील याबाबत उभयतांमध्ये एक मत झाले व बऱ्याच अंशी चर्चाही फलदायी झाल्याची भावना कामगार संघटनेने व्यक्त केली.



कामगार संघटनेतर्फे देण्यात आले निवेदनात प्रामुख्याने एक वेळ विशेष बाब वारस हक्क प्रकरण,सफाई कर्मचारी यांना घरे मोफत द्यावी,सफाई कर्मचारी यांना मेडिक्लेम लागू करावा,कर्मचारी यांना कर्ज प्रकरणासाठी हामीपत्र मिळावे,पेंशन विक्री चालू करणे,कर्मचाऱ्यांना वेळोवेळी गणवेश आणि साफसफाई साठी लागणारे साधने उपलब्ध करून देणे,सफाई कर्मचारी यांच्या मुला मुलींना समाज कल्याण मार्फत मिळणारी शिष्यवृत्ती मिळावी,साप्ताहिक सुट्टी मिळावी,नवीन सफाई कर्मचारी भरती करावी,सेवा निवृत्त कर्मचारी यांना निवृत्ती नंतर त्यांना त्यांच्या आर्थिक रकमेचा लाभ एका महिन्यात एक रकमी मिळावा असे अनेक मागण्या होत्या.

या चर्चेच्या वेळी नगरपालिकेकडून संगमनेर नगरपालिका मुख्याधिकारी श्री.दयानंद गोरे साहेब,आमदार श्री. सत्यजीत दादा तांबे, नगराध्यक्षा सौ.मैथिलीताई तांबे,किशोर पवार,नितीन अभंगव संगमनेर नगरपालिका सर्व प्रशासन अधिकारी उपस्थित होते.

अहमदनगर जिल्हा नगर परिषद कामगार संघटना शाखा संगमनेर तर्फे संघटनेचे संस्थापक अध्यक्ष अ‍ॅड.श्री.संग्राम जोंधळे साहेब,उपाध्यक्ष राजेश(खन्ना)जेधे,मा. नगरसेवक तथा संघटनेचे कार्याध्यक्ष घनशाम जेधे,जगदीश नरवाल,वीरू जेधे,राजेश नरवाल,गौतम जेधे,पप्पू तेजी,प्रीतम नरवाल,संदीप कागडे,रवींद्र नरवाल,डॅनियल कदम,बिलाल शेख आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# धनादेश अनादर प्रकरणी ऊस तोडणी कंत्राटदारास 1 वर्षाचा कारावास




**प्रवरातीर | वृत्तसेवा**
**संगमनेर प्रतिनिधी**

धनादेश अनादर प्रकरणी संगमनेर येथील अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी प्रसाद बी. जोशी यांनी ऊस तोडणी व वाहतूक कंत्राटदार संजय मालक सागर यास दोषी ठरवत १ वर्षाच्या साध्या कारावासाची शिक्षा सुनावली. तसेच फिर्यादी साखर कारखान्यास २ लाख रुपयांची नुकसान भरपाई २ सप्टेंबर २०२६ पासून प्रत्यक्ष वसुली होईपर्यंत ९ टक्के वार्षिक व्याजासह देण्याचे आदेश न्यायालयाने दिले. नुकसान भरपाई न दिल्यास अतिरिक्त दोन महिन्यांचा कारावास भोगावा लागणार आहे.

कौठे मलकापूर (ता. संगमनेर) येथील श्री गजानन महाराज शुगर लि. (पूर्वीचे नाव यूटेक) या साखर कारखान्याने २०१७-१८ च्या गाळप हंगामासाठी संजय सागर यांची ऊस तोडणी व वाहतूक कंत्राटदार म्हणून नियुक्ती केली होती. लेखी करारानुसार कंपनीने त्यांना १ लाख रुपये आगाऊ रक्कम धनादेशाद्वारे दिली होती. मात्र, करारानंतर त्यांनी काम सुरू केले नाही. कंपनीने आगाऊ रक्कम परत मागितल्यानंतर सागर यांनी स्वतःच्या स्वाक्षरीचा १ लाख रुपयांचा धनादेश दिला. मात्र, बँक खात्यात पुरेशी रक्कम नसल्याने धनादेश अनादरित झाला. त्यानंतर कंपनीने कायदेशीर नोटीस पाठवून रक्कम भरण्याची संधी दिली. तरीही रक्कम न भरल्याने कंपनीने संगमनेर न्यायालयात फौजदारी खटला दाखल केला.

सु ना व णी द र म्या न सागर यांनी धनादेश सुरक्षिततेसाठी दिला होता आणि त्याचा गैरवापर झाल्याचा बचाव केला. मात्र, या दाव्याच्या समर्थनार्थ ठोस पुरावा सादर करण्यात त्यांना यश आले नाही. कागदपत्रे, साक्षीदारांची उलटतपासणी आणि कायदेशीर तरतुदींचा विचार करून न्यायालयाने त्यांना दोषी ठरविले.

या प्रकरणात कारखान्याच्यावतीने अ‍ॅड. प्रणव गोंगे यांनी युक्तिवाद केला. त्यांना अ‍ॅड. धनश्री राठी, अ‍ॅड. परिमल बांबरे, अ‍ॅड. सोनाली बोटवे आणि अ‍ॅड. चेतन लखवानी यांनी सहकार्य केले.

# व्यवस्थापन शास्त्राच्या दीक्षारंभ कार्यक्रमाची उत्साहपूर्ण वातावरणात सांगता

**प्रवरातीर | वृत्तसेवा**
**संगमनेर प्रतिनिधी**

शिक्षण प्रसारक संस्थेच्या एम.बी.ए. संस्थेत प्रथम वर्षातील एम.बी.ए. आणि एम.सी.ए. विद्यार्थ्यांसाठी आयोजित 'जेनेसिस २०२६' या पाच दिवसीय दीक्षारंभ कार्यक्रमाची उत्साहपूर्ण वातावरणात सांगता झाली. विद्यार्थ्यांचा शैक्षणिक, व्यावसायिक व व्यक्तिमत्त्व विकास साधण्याच्या उद्देशाने आयोजित या कार्यक्रमात विविध क्षेत्रांतील तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमात नाशिक येथील तंत्रशिक्षण संचालनालयाचे सहसंचालक डॉ. गोरक्ष व्ही. गर्जे यांनी 'कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगातील व्यवस्थापन शिक्षण' या विषयावर मार्गदर्शन केले. उद्योजक गिरीश मालपाणी यांनी 'हनुमानजींकडून नेतृत्वाचे धडे – धैर्य, नम्रता आणि समर्पण', तर उद्योजिका



दिपाली चांडक यांनी 'उद्योजकता आणि नावीन्यपूर्णतेतील करिअरच्या संधी' या विषयांवर विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

प्रशांत रुणवाल यांनी 'कीप इट सिम्पल' या विषयातून साधेपणा, स्पष्टता व प्रभावी निर्णयक्षमतेचे महत्त्व स्पष्ट केले. श्रीमती शाल्मली शेट्टी यांनी व्यावसायिक शिष्टाचार व वर्तनाबाबत प्रशिक्षण दिले. भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी ऋतुजा गायकवाड व भारतीय पोलीस सेवेतील अधिकारी धनंजय दिघे यांच्या सहभागातून 'स्वप्न पाहा, विश्वास ठेवा आणि नियोजन करा' हा प्रेरणादायी संवादात्मक कार्यक्रम झाला.

पूर्वाचोथवेयांनीव्यवसायातील कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर व निर्णयप्रक्रियेबाबत मार्गदर्शन केले. सी.ए. महेंद्र जामधाडे यांनी आर्थिक ज्ञानाचे महत्त्व, तर प्रा. विजय राज फापळे यांनी योग, शारीरिक स्वास्थ्य व मानसिक आरोग्याबाबत मार्गदर्शन केले.

समारोपप्रसंगी शिक्षण प्रसारक संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. संजय मालपाणी यांनी भगवद्गीतेतील व्यवस्थापनाचे धडे दिले. निलेश सोनवणे यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे जीवनातील विविध क्षेत्रांत होणाऱ्या बदलांवर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संचालक डॉ. नितीन झावरे, विभाग प्रमुख डॉ. किरण गोंटे, समन्वयक डॉ. नेहा शाह, सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.






# संगमनेरला 102 कोटींच्या विविध विकासकामांचा आज शुभारंभ व लोकार्पण

**प्रवरातीर | वृतसेवा**

**संगमनेर प्रतिनिधी**

संगमनेर तालुक्यातील विविध विकासकामांना चालना देण्यासाठी सुमारे १०२ कोटी रुपयांच्या विकास कामांचा भूमिपूजन आणि लोकार्पण सोहळा बुधवार,दि२३सप्टेंबर २०२६ रोजी जलसंपदमंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील व आमदार अमोल खताळ पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत भूमिपूजन व लोकार्पण सोहळा होणार आहे.

संगमनेर तालुक्यातील चिंचोली गुरव येथे सुमारे ४ कोटी ४७ लाख रुपये खर्चाच्या उपसा जलसिंचन योजना कामाचे भूमिपूजन करण्यात येणार आहे. या योजनेमुळे परिसरातील शेतीसाठी सिंचनाच्या सुविधा उपलब्ध होण्यास मदत होणार आहे.तसेच समनापूर येथील



गणपती मंदिर परिसरामध्ये सुमारे ९७ कोटी २५ लाख रुपये खर्चाच्या संगमनेर ते वडगाव पान फाटा, निळवंडे ते कौठे कमळेश्वर राष्ट्रीय महामार्ग (जांभूळवाडी फाटा) या मार्गावरील रस्ते सुधारणा कामाचा शुभारंभकरण्यात येणार आहे. तसेच संगमनेर नगरपरिषद हद्दीतील साई नगर येथील म्हाळुंगी नदी पुलाला स्व. खासदार बाळासाहेब विखे साईसेतू या नामफलकाचे अनावरण करण्यात येणार आहे.तसेच गंगामाई घाटावर सुमारे४०लाख रुपये खर्चून बांधण्यात आलेल्या हिंदू दशक्रिया विधी घाटाचे लोकार्पणही करण्यात येणार आहे. तसेच श्रीराम मंदिर व हनुमान मंदिर येथील सुमारे३० लाख रुपये खर्चाच्या सभामंडपाचे लोकार्पण करण्यात येणार आहे. या विकासकामांच्या भूमिपूजन व लोकार्पण सोहळ्यास महायुतीचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन महायुतीच्या वतीने करण्यात आले आहे.

# भारनियमन आणि पाणीटंचाईवर गांभीर्याने उपाययोजना करा

**प्रवरातीर | वृतसेवा**

**संगमनेर प्रतिनिधी**



जिल्ह्यातील टंचाईची परिस्थिती लक्षात घेऊन महसूल, महावितरण आणि जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांनी नागरिकांच्या समस्या समजून घेऊन तातडीने उपाययोजना करण्याच्या सूचना जलसंपदा तथा पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिल्या. ग्रामीण भागातील भारनियमन कमी करून शेतकऱ्यांना दिलासा देण्याबरोबरच टँकरद्वारे होणाऱ्या पाणीपुरवठ्याचे काटेकोर नियोजन करण्याचे निर्देश त्यांनी अधिकाऱ्यांना दिले.

लोणी येथील जनसंपर्क कार्यालयात आयोजित जनता दरबारात डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी जिल्ह्यातील नागरिकांच्या समस्या जाणून घेत निवेदने स्वीकारली. त्यानंतर अधिकाऱ्यांची तातडीची बैठक घेऊन प्राप्त निवेदनांवर त्वरित कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या. संबंधित नागरिकांना केलेल्या कार्यवाहीचा अहवाल कळविण्याचेही निर्देश देण्यात आले.

जनता दरबारात भारनियमनाबाबत मोठ्या प्रमाणात तक्रारी प्राप्त झाल्या. अनेक ठिकाणी रोहित्रांच्या समस्येमुळे भारनियमन वाढले असून, काही गावांमध्ये कृषी आणि गावठाण फिडर एकत्रित असल्यामुळेही वीजपुरवठ्याची समस्या निर्माण होत असल्याचे निदर्शनास आले. या पार्श्वभूमीवर महावितरणच्या अधिकाऱ्यांनी संबंधित गावांचा प्रत्यक्ष सर्व्हे करून सविस्तर अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. २४ सप्टेंबर रोजी महावितरणची स्वतंत्र बैठक घेऊन या प्रश्नाचा आढावा घेण्यात येणार आहे.

दरम्यान, सप्टेंबर महिन्यातही काही तालुक्यांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. संगमनेर तालुक्यात टँकरची मागणी मोठ्या प्रमाणात होत असल्याने गावनिहाय टँकरचे काटेकोर वेळापत्रक तयार करून मागणीनुसार टँकर उपलब्ध करून देण्याचे नियोजन करण्याचे निर्देश देण्यात आले. गटविकास अधिकाऱ्यांनी याबाबत संवेदनशीलतेने कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

जलसंपदा विभागाच्या नियोजनानुसार पाण्याचे आवर्तन सुरू असून पाण्याचा अपव्यय होणार नाही, याची दक्षता घेण्यास अधिकाऱ्यांना सांगण्यात आले. आवर्तनाचा कालावधी संपलेल्या भागात कालव्यांवरील अतिक्रमण हटविण्याची मोहीम सुरू ठेवण्याचे निर्देशही देण्यात आले.

याशिवाय प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेच्या उपलब्ध निधीतून रस्त्यांची कामे दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्याची दक्षता सार्वजनिक बांधकाम विभागाने घ्यावी, अशा सूचना देण्यात आल्या. प्रत्येक तालुक्यात प्रत्यक्ष जाऊन टंचाई परिस्थितीचा आढावा घेण्यात येणार असून, गावनिहाय भेटींचा प्राथमिक अहवाल अधिकाऱ्यांनी तयार ठेवण्याचे निर्देश पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले.


# कोतूळ आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्थेच्या सात संचालकांवर अपात्रतेची कारवाई

**प्रवरातीर | वृतसेवा**

**संगमनेर प्रतिनिधी**

तालुक्याच्या आदिवासी विभागातील महत्त्वाची आणि सर्वात मोठ्या संस्थांपैकी एक असलेल्या कोतूळ आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्थेच्या सात विद्यमान संचालकांवर कर्ज थकबाकीच्या कारणावरून अपात्रतेची कारवाई करण्यात आली आहे. सहकारी संस्थांचे सहाय्यक निबंधक अमोल वाघमारे यांनी शुक्रवारी याबाबत आदेश जारी केला. संस्थेचे विद्यमान अध्यक्ष विशाल नामदेव गोडे तसेच माजी अध्यक्ष व विद्यमान संचालक रघुनाथ गेनू जाधव यांचा कारवाई झालेल्यांमध्ये समावेश असल्याने सहकार क्षेत्रात खळबळ उडाली आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमानुसार ही कारवाई करण्यात आली आहे. संबंधित संचालक संस्थेकडून घेतलेल्या कर्जाच्या थकबाकीत असल्याने समिती सदस्य अथवा संचालक म्हणून पदावर राहण्यास अपात्र ठरत असल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे. कारवाई झालेल्या संचालकांमध्ये विशाल नामदेव गोडे यांच्याकडे ६२ हजार ५०० रुपये, रघुनाथ गेनू जाधव यांच्याकडे ७५ हजार रुपये, संदीप रघुनाथ लेंभे यांच्याकडे १ लाख रुपये, बाळासाहेब लक्ष्मण लेंभे यांच्याकडे १ लाख २१ हजार ७०१ रुपये, भागा गंगाराम शेळके




यांच्याकडे २५ हजार रुपये, उषा नामदेव गोडे यांच्याकडे २ लाख २५ हजार रुपये आणि सुगंधाबाई नामदेव बांबळे यांच्याकडे १ लाख १२ हजार ५०० रुपये इतकी कर्ज थकबाकी असल्याचे आदेशात नमूद आहे.

या प्रकरणाला ८ जुलै रोजी सुरुवात झाली. कर्ज थकबाकीच्या अनुषंगाने संबंधित संचालकांच्या पात्रतेबाबत सहकार विभागाकडे प्रक्रिया सुरू करण्यात आली. त्यानंतर संबंधितांना आपली बाजू मांडण्याची संधी देण्यात आली. उपलब्ध कागदपत्रे, कर्ज थकबाकीची नोंद आणि संबंधित कायदेशीर तरतुदींचा विचार करून सहकारी संस्थांचे सहाय्यक निबंधक अमोल वाघमारे यांनी सात संचालकांवर अपात्रतेची कारवाई करण्याचा आदेश जारी केला.

या निर्णयामुळे कोतूळ आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्थेच्या आगामी कामकाजावर तसेच संचालक मंडळाच्या रचनेवर परिणाम होण्याची शक्यता आहे.

# श्री गणेशोत्सवात संगमनेरातील अनेक रस्ते बंद. वाहतूक कोंडीने नागरिक त्रस्त

**प्रवरातीर | वृतसेवा**

**संगमनेर प्रतिनिधी**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर विविध मंडळांनी ऐन वाहतुकीचे महत्त्वाचे रस्ते बंद करून पेंडॉल उभारल्यामुळे संगमनेर शहरात सर्वत्र वाहतुकीची कोंडी होत आहे विशेष म्हणजे रस्त्यात पेंडॉल उभारले तरी पोलीस प्रशासन वाहतूक प्रशासन सुस्त असल्याचे स्पष्ट झाले आहे अहो रस्ते कसे काय बंद करून तुम्ही गणेशोत्सव साजरा करू शकता? असा सवाल सुज्ञ नागरिकांनी उपस्थित केला आहे म्हणून आगामी आरास व गणेश दर्शन च्या पार्श्वभूमीवर वाहतुकीची कोंडी होऊ नये याची खबरदारी शहर पोलीस निरीक्षक यांनी स्वतः घ्यावी अशी मागणी होत आहे



संगमनेर शहरातील प्रमुख चौकांमध्ये वाहतूक कोंडीची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत आहे. अकोले नाका, तीन बत्ती चौक, दिल्ली नाका, बसस्थानक परिसरात सिग्नल असूनही वाहनचालकांकडून नियमांचे उल्लंघन केले जात आहे. घुलेवाडी रिक्षा स्टँडमुळे तसेच रस्त्याच्या दुतर्फा रिक्षा उभ्या केल्याने वाहतुकीस अडथळा निर्माण होतो. व्यापारी संकुलांसमोर अनधिकृत पार्किंग, मोठ्या शॉपिंग कॉम्प्लेक्ससमोर पार्किंगची अपुरी व्यवस्था आणि भरधाव दुचाकीमुळेही समस्या वाढली आहे. शहरातील १३२ केव्ही ते दिल्ली नाका, जोर्वे नाका परिसरात फुटपाथवर फेरीवाल्यांचे अतिक्रमण झाले आहे. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर वाहतूक कोंडी अधिक वाढली असून, वाहतूक पोलिसांची प्रभावी कारवाई आवश्यक असल्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

हे सायं. दैनिक प्रकाशक, प्रिंटर्स संपादक श्री. शिवपालसिंह प्रतापसिंह ठाकूर यांनी प्रवरा प्रिंटींग प्रेस, घोडेकर मळा, संगमनेर, ता. संगमनेर, जि.अ.नगर (महाराष्ट्र) येथे छापून याच ठिकाणी कार्यालयात प्रकाशित केले. पी.आर.बी. कायद्यानुसार अंकात प्रसिध्द केलेल्या मजकुराची जबाबदारी यांचेवर राहील. मालक संपादक धिरजसिंह शिवपालसिंह ठाकूर, मो ९९७०९६८३९९ संगमनेर न्यायकक्षेत